**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०४ ची साक्ष**

**मी याव्दारे शपथपुर्वक निवेदन करतो की ,**

माझे नाव – ओंकार विलास कदम, वय – २५ वर्षे,

व्यवसाय – शेती

रा. – गढीताम्हाणे, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग

**शपथेवर सरतपासणी सरकारतर्फे सहा.सरकारी अभियोक्ता श्री. एम.जी. काळदाते यांचे मार्फत.**

०१. घटना दि.२१/०३/२०२४ रोजी घडली होती. घटना रात्री ११.३० वा. घडली होती. घटना केगदवणे येथे संभाजी कदम यांच्या बागेत घडली होती. त्यावेळेस मी आमच्या बागेतून संभाजी कदम यांच्या बागेत येत होतो. मला आरडाओरड करण्याचा आवाज आला. त्यावेळेस मी घटनास्थळी आलो. त्यावेळेस आदित्य कदम हा संभाजी कदम यास दांडयाने मारत होता. संभाजी याचेच नाव यशवंत विश्वास कदम असे देखील आहे. मी त्यांना संभाजी असे संबधतो. आदीत्य हा संभाजी कदम यांच्या पायावर दांडयाने मारत होता. मी घटनास्थळी गेल्यावर ते निघून गेले. मी आदित्य याला पाहिल्यास ओळखू शकतो. दुसरे कोण उपस्थित होते ते मला दिसले नाही. आज आदित्य न्यायालयात उपस्थित आहे.

सरतपास पूर्ण.

**आरोपी क्र.१ व २ तर्फे उलटतपास विधीज्ञ श्री.ए.एम.माणगावकर यांचे मार्फत.**

०२. मी आरडाओरड ऐकून संभाजी कदम यांच्या बागेत जात होतो. मी दोन दांडे मारताना पाहिले. मी आरडाओरड ऐकून गेलो त्यामुळे मी जाण्यापुर्वी काही दांडे मारले होते अगर कसे हे मला माहीत नाही. यशवंत याने मी येण्यापुर्वी देखील दांडे मारल्याचे मला सांगितले. मी घटना पाच मिनीटे पाहिली. यशवंत यास कोणतीही जखम झाली नाही, त्यास केवळ चालता येत नव्हते. दांडे मारते वेळेस यशवंत झोपलेले होते. मी यशवंत यास उठवण्याचा प्रयत्न केला. परंतु, यशवंत उठू शकले नाही. माझ्याकडे मोबाईल फोन आहे. हे म्हणणे खरे आहे की, यशवंत याच्याकडे देखील मोबाईल होता. सदर घटना घडल्यानंतर रात्री ११.३० वा.

मी यशवंत याच्या मोबाईलवरुन घटनेबाबत कोणासही कळवले नाही. यशवंत याला पाहिल्यावर त्यास वैदयकीय उपचाराची गरज असल्याबाबत माझे मत झाले होते. यशवंत यास सकाळी ७.३० च्या दरम्यान वैदयकीय उपचार दिले. रात्री ११.३० ते सकाळी ७.३० वा. पर्यंत आम्ही दोघे बागेतच होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी व यशवंत भाऊबंद आहोत. हे म्हणणे खरे आहे की, बागेची राखण करण्याकरिता मी व यशवंत एकमेकांस मदत करतो. हे म्हणणे खरे नाही की, आंबा काढणीच्या वेळेस मी व यशवंत गरज लागल्यास एकमेकांस मदत करतो. हे म्हणणे खरे नाही की, आदित्य याने यशवंत यास दांडयाने मारहाण केल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आदित्य याने कधीही यशवंत यास दांडयाने मारले नाही. हे म्हणणे खरे नाही की, केवळ यशवंत याच्या सांगण्यावरुन आज मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, यशवंत यास संभाजी या नावाने देखील ओळखतात हे मी खोटे सांगत आहे.

उलटतपास पूर्ण

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

सही/-

(श्रीकांत एस.पचंडी)
न्यायंडाधिकारी वर्ग-१, देवगड

दि. ११/०८/२०२५